# चौथे प्रकरण

## 'पाणिपतची बखर' आणि 'भाऊसाहेबांची बखर'

## तुलनात्मक आकलन

## चौथे प्रकरण

# 'पाणिपतची बखर' आणि 'भाऊसाहेबांची बखर' तुलनात्मक आकलन

पाणिपतची बखर आणि भाऊसाहेबांची बखर या दोन्ही बखरींचा वर्ण्य विषय पानिपताच्या युध्दाचा आहे. या दोन्ही बखरीतील घटना व प्रसंग पानिपतवरील युध्दभूमीशी निगडीत आहेत. असे असले तरी या युध्दाची पूर्वपीठिका, युध्द होण्यास कारणीभूत असलेली पालेमुळे यांची सविस्तर नोंद भाऊसाहेबांच्या बखरीत आढळून येते. ऐतिहासिकदृष्ट्या इ.स. १७५३ ते ६० या सात-आठ वर्षात घडलेल्या घटना म्हणजेच उत्तरेकडील राजकारणांची हकीकत याचे सविस्तर वर्णन हे फक्त भाऊसाहेबांच्या बखरीत विशेषकरून आढळून येते तर पाणिपतच्या बखरीत प्रत्यक्ष पानिपतवरील युध्दभूमीवरचाच तपशील दिसून येतो.

## कथावस्तू

रघुनाथ दादा हे उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेवर मल्हारराव होळकर,जयाजी शिंदे, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले यांच्यासह आपली फौज घेवून निघाले असता सुरजमल जाटांचा प्रदेश आल्यानंतर रघुनाथदादांनी त्यांच्याकडे एक कोट रूपये मागितले. जाट चाळीस लाख देण्यास तयार होते. त्यामुळे त्यांच्यात युध्द झाले. त्या युध्दात मल्हाररावांचा एकुलता एक पुत्र खंडोजीराव यांचा मृत्यू झाला तेव्हा मल्हाररावांनी जाटांचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. तेव्हा मल्हारराव बोलतील ते करतील म्हणून सुरजमल जाट घावरून शिंद्यांच्याकडे मदत मागण्यास गेले 'शरण आलेया मरण चिंतू नये' म्हणून जयाजी शिंदेनी त्यांना आश्रय दिला. यातूनच शिंदे होळकरांचे वितुष्ट निर्माण झाले. पुढे मारवाड प्रांतात जयाजी शिंदे व दत्ताजी शिंदे यांनी रामसिंगास मदत करून बिजेसिंगाशी युध्द केले व रामसिंगाला प्रदेश मिळवून दिला. तेव्हा बिजेसिंगाने मल्हाररावांच्याकडे मदत मागितली. तेव्हा मल्हाररावांनी शिंदेंचा बदला घेण्यासाठी बिजेसिंगास

मदतं केली व जयाजी शिंदेंला मारेकरी घालून ठार मारले, तेव्हा शिंदेनी जयाजीच्या वधामागे मल्हाररावांचे कारस्थान आहे हे ओळखले. त्यातूनच शिंदे होळकरांच्या संघर्षाला सुरवात झाली. पुढे मलिका जमानीचे दु:ख व व्यथा तिला नजीबखानने दिलेला सल्ला, या सर्व गोष्टी भाऊसाहेबांच्या बखरीत तपशीलवार आल्या आहेत. पाणिपतच्या बखरीत मनसुरअली हे पात्र म्हणजेच नजीबखान रोहिला हे संपादकांचे मत योग्य वाटते. हा नजीबखान पाणिपतच्या बखरीत अबदालीचा साथीदार म्हणून येतो तर भाऊसाहेबांच्या बखरीतील तो एक विरोधी पक्षाचा सुत्रधार आहे. तो कुटील कारस्थानी असल्यामुळे रघुनाथ रावांनी दत्ताजीला सांगितले की काहीही करून या नजीबखानाला 'ठार मार' परंतु मल्हाररावांनी जनकोजीला सांगितले की आपण याचा नि:पात केला तर पेशवे एक दिवस तुम्हाला धोतरे बडवावयास लावतील. ह्याचा परिणाम म्हणूनच नजीबखान भाऊसाहेबां सारख्यांना भारी पडला. म्हणून बखरकार लिहितात 'नजिबखानने प्यादेमात केली.' त्यानंतरचा तपशिल हा पानिपतच्या बखरीत दिसून येतो. त्यामुळे पानिपतच्या युध्दाची जी पाळेमुळे रूजली त्याची सर्व सविस्तर कारणे ही भाऊसाहेबांच्या बखरीत आढळून येतात. तर पाणिपतच्या बखरीत कथानक धावते ठेवले आहे. भाऊसाहेब उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेवर निघतात इथून पुढचा टप्पा हा पाणिपतच्या बखरीत आढळून येतो.

गौतमाबाईने दत्ताजी शिंदेच्या वधामुळे मल्हाररावांची जवळ जवळ निर्भत्सनाच केली. जनकोजी व मल्हारराव यांना बोलवून शत्रूंचा पराभव करावा असे सांगितले. शिंदे आणि होळकरांनी एकमेकांच्या वैमनस्यातून शत्रूंकडून हार पत्करली तेव्हा त्यांचा गर्वपरिहार करावा व शत्रूचे पारिपत्य करावे म्हणून भाऊसाहेब उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेवर निघाले. त्यांनी गाजुदीखान आणि जाटाच्या सहाय्याने दिल्लीचा किल्ला जिंकला. भाऊंनी सिंहासनाच्या छतावरील तख्ताची चांदी काढून फौजेचा पगार चुकता केला. जाटांनी भाऊसाहेबांना तख्ताची चांदी काढण्यास विरोध केला. त्यामुळे भाऊसाहेबांनी जाटांचा अपमान केला. तसेच जाटांनी गाजुदीखानास वजिरी द्यावी असा आग्रह धरला. परंतु भाऊंनी बळवंतरावांच्या सल्ल्याने नारोशंकरास 'राजेबहादर' हा किताब दिला. त्यामुळे शिंदे होळकरांच्या भावना दुखावल्या. त्यांनी जाटांना आपल्या प्रदेशात निघून जाण्यास सांगितले. पुढे अचानक संकट आले. शत्रूच्या सैनिकांनी चारी बाजूंनी मराठी सैनिकांना घेरले. त्यामुळे भाऊसाहेब गोंधळून गेले. अशा परिस्थितीत मल्हाररावांनाही सल्ला देण्यास नकार दिला. बळवंतराव मेहेंदळ्याच्या चुकीच्या सल्ल्यामुळे भाऊसाहेब पेचात पडले. युध्दात गोविंदपंत बुंदेल्यांचा, बळवंतराव मेहेंदळ्यांचा व विश्वासरावांचा मृत्यू झाला. सैन्यात अन्नधान्याचा दुष्काळ पडला. त्यामुळे सैनिक उपाशी मरू लागले. तसेच इभ्रामखान गाड्याने खंदक खणून लढण्याविषयी दिलेला अनोखा सल्ला ह्या सर्व कारणांमुळे पानिपतच्या युध्दात मराठ्यांचा पराभव झाला. अशा पध्दतीने पानिपतच्या युध्दातून

जे जगले - वाचले ते काही पुण्यास परतले भाऊसाहेबांच्या निधनाची दु:खद वार्ता ऐकून नानासाहेबांनी भाऊ ! भाऊ ! म्हणून शोक केला. त्यातच त्यांचे निधन झाले. असे हे हृदयाला चटका देणारे सविस्तर वर्णन पानिपतच्या बखरीत आणि भाऊसाहेबांच्या बखरीतही आढळून येते. सविस्तर आणि वाङ्मयगुणांनी युक्त असे वर्णन भाऊसाहेबांच्या बखरीत दिसून येते. या बखरीत बखरकाराने उत्कृष्ट म्हणींचा वापर केला आहे. अनेक अलंकार वापरले आहेत. यावरून तो अभ्यासू,व्युत्पन्न पंडित होता हे लक्षात येते.

## युध्दवर्णने-

पाणिपतच्या बखरीत आणि भाऊसाहेबांच्या बखरीत अनेक वेळा युध्द वर्णने आली आहेत. ही युध्द वर्णने रामायण - महाभारताची आठवण करून देणारी आहेत. साक्षात भिम अर्जुनासारखे भाऊसाहेब आणि त्यांचे शिपाई लढताना दिसतात. भाऊसाहेबांच्या बखरीत तुलनेने पाणिपतच्या बखरीत बहारदार वर्णने आहेत.

''रणांगणाचा शृंगार करून धग्या, बखतरे, टोप व चिलखते, बिऱ्या व बिरजे वस्त्रे व तकटी व मुक्तमाला व मस्तकी तुरे व कलग्या व अंगी बारा अलंकार व जरीचे अवदागिरे करून शोभायमान हाती पट्टे व गुरगुज व फिरंगणा व बिचवे व कटारा व पेशकब्जे व भाले व कोयते व परीघ पट्टीश व गारभांडी व सांगा व बरच्या व बंदुका कटितलीस व शस्त्रसंभार बांधून आपआपलाले वाहनारूढ होऊन अंगी स्फुरणे अतिशय युध्दास जावयास अति उदित, स्वामी सेवेशी तत्पर अशा आवेशाचे पुरूष हजारो हजार सिध्द जाहले.'' असे युध्दातील सामग्रीचे वर्णन पाणिपतच्या बखरीत आढळून येते. तसेच प्रत्यक्ष युध्दभूमीवर ''लढाईची हातघाई झाली भाला व बिचवे गुरगुजे व जमदाडा व वाघनखे यांचे चपेटे फार झाले. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून पुढचे पाय पुढे टाकू लागले कोणी मागे फिरेना सक्रोध होऊन अवसाने धरून एकमेकांवर पर्जन्यप्राय कोसळू लागले. मल्लयुध्दाचे मारणेच कडोविकडींचे परस्परे दाखवू लागले. पुढे युध्दास तोंड लागले. दारूण संग्राम जाहला. हवद्यास हवदे, राऊतास राऊत एकमेळ जाहाला व सुतरनाले बाणांच्या कैंच्या व करोलांच्या गोळ्या व गरनाळ व तोफांचा मारा एकदाच जाहाला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यात माजली. तसेच पानिपतच्या युध्दात 'हर हर महादेव' म्हणून लढणारे मराठे व 'दीन दीन' अशी गर्जना करून लढणारे दुराणी तीन चार तासपर्यंत एकच घाई जाहाली. मुर्द्यावर मुर्दे पडू लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासे जाहाले वीर रणामध्ये माजले. रणमद चढला. खाशा, खाशांचे हौदे एकास एक लागून जोरावारीने लढो लागले. दशाग्नी शताग्नीशी मारू लागले. शिरे तुटोन धडावेगळी जाहाली. परंतु कोणी माघार घेईना.'' युध्दभूमीवरील ही दृश्यात्मक वर्णने वाचकांच्या डोळ्यांसमोर तो प्रसंग उभा करतात.

भाऊसाहेबांच्या बखरीत युध्दवर्णने थोडक्यात आली आहेत. "घे घे मार मार" अशा गर्जना करत सर्व सैनिक त्वेषाने लढु लागले. मुडद्यावर मुडदे पडू लागले. रक्ताचे पाट वाहु लागले. भाऊसाहेबांच्या तोंडास खरस आली. हाणा ! हाणा ! म्हणावयास लागले. तोंडापुढे कोणी ओळख्या आला तरी हुंकार देवून मानेने आज्ञा दाखवू लागले. अंगावर ब्रम्हांड कोसळले. परंतु हिंमत हरली नाही. भाऊसाहेब यांजसारखे पराक्रमी दुसरा होणे असाध्य गोष्ट" इ. वर्णने भाऊसाहेबांच्या बखरीत युध्दाला साजेशी अशी बखरकाराने रेखाटली आहेत.

या दोन्ही बखरींचा विचार केला असता पाणिपतच्या बखरीतील आणि भाऊसाहेबांच्या बखरीतील युध्दवर्णने दृश्यात्मक झाली आहेत. तसेच भाऊसाहेब, म्हल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे यांची तुलना भीम-अर्जुनांशी केलेली आहे. साक्षात पानिपतचे युध्द म्हणजे कौरव-पांडवांचेच युध्द असा भास होतो. त्यामुळे पाणिपतची बखर म्हणजे पानिपतचे युध्द असेच या बखरीचे वर्णन करता येईल.

भाऊसाहेबांची बखर उत्तर हिंदुस्थानातील इतिहासाचे बारीक सारिक धागे विणताना दिसते. बखरकाराला तिकडील इतिहास आणि भूगोल चांगला माहित आहे. त्याचबरोबर मराठा सरदार, उत्तरेकडील संस्थानिक, राजे यांची चांगली माहिती त्यास आहे. तत्कालीन राजकारणाचा या बखरकाराचा तपशीलवार अभ्यास असल्याचे दिसते. नजीबखान रोहिला हा मराठ्यांविरूध्द असलेला असंतोष एकत्र करणारा धूर्त माणूस ! मलकाजमानी, सुजातद्दौला, अबदाली यांच्याशी संपर्क साधून या तिघांना एका सूत्रात गोऊन त्याने मराठ्यांविरूध्द रान उठवले. राघोबादादांनी जनकोजी व दत्ताजींस भेटून नजीबखानाचे पारिपत्य करावे अशा सूचना दिल्या. पण मल्हाररावांनी या दोघांनाही सांगितले, "--हिंदुस्थानात एक नजीबखान मात्र खणू राहिला आहे. त्याचे पारिपत्य केलिया पेशवे आटकेपासून जासुदाचे हाती पैसा आणवतील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत जाहालो. मग कोणी पुसणार नाही. यास्तव एवढे 'खणू' रक्षून जे करणे ते करावे." विशेष म्हणजे जनकोजी व दत्ताजी या दोघांनाही ते पटले. त्या दोघांनी व मल्हाररावांनी संधी मिळूनही त्याचे पारिपत्य करण्याचे टाळले. पुढे बाटलीत बंद असलेला हा राक्षस बाहेर आला आणि याने संबंध मराठी रियासतीलाच प्रचंड हादरा दिला. शिंदे-होळकरांनी स्वार्थासाठी हातचा सोडलेला हा नजीबखान म्हणजे एक प्यादा होता. पण याच प्याद्याने भाऊसाहेबांना जेरीस आणले. याच प्याद्याने राजावर मात केली. म्हणून ही प्यादेमात होय. भाऊसाहेबांच्या बखरीत नजीबखान रोहिला या प्याद्याने प्यादेमात कशी केली त्याचे साद्यंत वर्णन आले आहे. वेळोवेळी हा कसा निसटत गेला आणि पुढे याच सरदारांना तो भारी पडला. अबदालीशी संधान बांधून याच नजीबखान रोहिल्याने मराठी रियासतीला कसा जोरदार दणका दिला, याच विषयाभोवती ही बखर गुंफली आहे. पाणिपतच्या बखरीत नजीबखान हा

अबदालीचा साथीदार म्हणूनच आला आहेत. त्याचा स्वतंत्र परिचय तेथे येत नाही. शत्रूपक्षातील एक म्होरक्या एवढीच त्याची ओळख तेथे येते.

पाणिपतची बखर ही मुळात भाऊसाहेब उत्तर हिंदुस्थानच्या मोहिमेस रवाना होतात व त्यांची पुढे अबदालीशी रणात कशी भेट होते याचेच वर्णन करते. भाऊसाहेबांची सरशी होते पण शेवटच्या युध्दात विश्वासरावासह ते धारातिर्थी पतन पावतात-एवढाच मोजका व नेमका विषय पाणिपतच्या बखरीत आला आहे. म्हणजे इतिहासाचा एक छोटासा भाग त्यात येतो. त्यामुळे पाणिपतची बखर वाचकाला आटोपशीर व रसाळ वाटते. धनुष्याच्या दोरीपासून सुटलेला बाण आपले लक्ष्य वेधतो त्याप्रमाणे या बखरीची रचना एका दिशेने झाली आहे. याउलट भाऊसाहेबांच्या बखरीचा आवाका खूप मोठा आहे. उत्तर हिंदुस्थानातील तत्कालीन राजकारणातील बारीक सारीक घटनांचे सूक्ष्म वर्णन त्यात येते. मराठ्यांचे त्यावेळचे स्थान कोणते होते-भाऊसाहेबांचा हेका कसा चुकीच्या दिशेने चालत होता, होळकर-शिंदे यांची नाराजी या सबंध पृष्ठभूमीवर भाऊसाहेबांच्या बखरीत प्रकाश पडतो.

दुसरे म्हणजे भाऊंच्या जवळच्या शिंदे-होळकर व अन्य मराठा सरदारांनी भाऊसाहेबांकडे येऊन त्यांना स्पष्ट शब्दांत दुषणे दिली आहेत. 'हेका करून मसलत बुडविली. सर्व लयास गेले.' असा भाऊसाहेबांवर त्यानी रोखठोक आरोप केला आहे. हे तपशीलवार संभाषण 'पाणिपतची बखर' मध्ये आले आहे. भाऊसाहेबांच्या बखरीत होळकर-शिंदे नाराज होते एवढा उल्लेख येत राहतो. त्या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर 'भाऊसाहेबांची' आहे तर पाणिपतची बखर 'पानिपतची' आहे.

## व्यक्तिचित्रे

१.मल्हारराव होळकर-

पाणिपतच्या बखरीत आणि भाऊसाहेबांच्या बखरीत मल्हारराव होळकर एक अनुभवी सेनानी तसेच वडीलधारी एक मार्गदर्शन तसेच धूर्त, मतलबी, कारस्थानी असे त्यांच्या स्वभावात विविध पैलू दिसून येतात. पानिपतचे युध्द ते होण्यामागील कारणे यासाठी मल्हाररावांचे जवळचे नाते आहे. भाऊसाहेबांच्या बखरीत मल्हारराव मतलबी, धूर्त, कारस्थानी दिसून येतो तर पानिपतच्या बखरीत एक अनुभवी वडीलधारीपणा प्रसंगावधान तसेच संयमी असे विविध गुण दिसून येतात.

धूर्त, मतलबी व कारस्थानी-भाऊसाहेबांच्या बखरीत जाट व जयाप्पा शिंदे पगडीभाई झाल्यावर मल्हारराव 'आमचे अस्तनीतच आग्न आहे.' असे पेशव्यांना सांगतात. मारवाड प्रांतात वरकरणी शिंदेंची बाजू घेवून अंतर्गत बिजेसिंगास मोगलाई मसलत करून कार्य सिध्दीस

न्यावे म्हणजे जयाजी शिंदेचा वध करण्यास सांगतो. पेशवाईत आपले सर्वस्व कायम रहावे यासाठी तो जिवाचा आटापिटा करतो. नजीबखानाला ते आपला धर्मपुत्र मानतात. व त्याचे रक्षण करतात. दत्ताजी शिंदे शत्रूशी लढता लढता घायाळ होऊन धारातीर्थी पडतात. त्यामुळे जनकोजीला रणातून माघार घ्यावी लागते. तरीसुध्दा मल्हारराव होळकर त्यांच्या मदतीला जात नाहीत. कारण शिंद्यांचे पारिपत्य झाले की उत्तरेत आपले वर्चस्व राहील अशी अपेक्षा करतात. त्यांचे वागणे दुटप्पी आहे. एकीकडे ते नजीबखानाला फुस देतात. तर दुसरीकडे शिंद्यांच्याबद्दल आपल्या मनात प्रेम आहे असे दाखवितात. गौतमाबाई जेव्हा त्यांची निर्भत्सना करते-''सुभेदार, तुमची उमर साठ वर्षांची झाली---- या पृथ्वीवर कीर्त मिळवून किती पन्नाशा जगणे आहे?'' हे ऐकल्यानंतर मल्हारराव दात ओठ चावून म्हणतो की, 'तुझे चित्त पाहिले !' असा हा मल्हारराव आपल्या पत्नीलाही फसविण्याचा प्रयत्न करतो. आपला स्वार्थीपणा मतलबीपणा दडवू पाहतो.

पाणिपतच्या वखरीत आपल्या पन्नास हजार फौजेनिशी पेशव्यांना साथ देतो. भाऊसाहेबांशी युध्दविषयक मसलत करतो. युध्दात जेव्हा अबदालीची सरशी होत जाते मराठ्यांच्या सैन्यास अन्न व घोड्यास दाणा वैरण मिळेनाशी होते, अन्नाची महर्गता वाढते तेव्हा मल्हारराव भाऊसाहेबांना तह करण्याचे आवाहन करतो. यातून वडीलधारीपणा दिसून येतो. अबदालीच्या प्रचंड सैन्यापुढे शिंदे-होळकरांचे सैन्य कमी पडले. त्यासाठीच गनिमी काव्याचा अंगीकार करून त्याने उत्तरेकडील मुलुखात अफरातफरी मांडली. आपले होणारे नुकसान पाहून रजपुत व जाट यांच्याशी तह करतो. दक्षिणेतून येणाऱ्या कुमकेस लागलेला विलंब, समोर अबदालीचे प्रचंड सैन्य आणि उत्तरेकडील सत्तांची अलिप्तता यामुळे तह करण्याविषयी भाऊंना विनंती करतो यातून त्यांचा अनुभवी व वडीलधारीपणा दिसून येतो.

## २.जनकोजी शिंदे-

जनकोजी हे शिंदे घराण्यातील एक शूर व्यक्ती. तो स्वत:च्या बळावर अनेक युध्दे करतो. त्यात तो यशस्वी होतो. मल्हारराव हे जयाजी शिंदेच्या मृत्यूला कारणीभूत आहेत हे त्याला माहित असते. शिंदे-होळकरांच्या युतीमुळे पेशव्यांच्यावर आपला वचक बसेल म्हणून मल्हारराव आपल्याबद्दल गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करतात. परंतु जनकोजी म्हणतात मल्हारराव हे आपले शत्रू आहेत. त्यांच्यापासून दूर राहणेच पसंद करतात. सैन्यात अन्न दुष्काळ पडतो. सैनिक उपाशी मरू लागतात. अशा वेळी जनकोजी काही निवडक सरदारांना घेवून भाऊसाहेबांना म्हणतात-''तुमच्या हेक्यामुळे सर्वांचा घात केलात. तुमची बुध्दी भ्रष्ट झाली. तुम्ही कोणाचेच ऐकत नाही.'' अनुभवी जनकोजी शिंदे भाऊसाहेबांना वेळोवेळी योग्य सल्ला

देत असत. भाऊसाहेबांच्या बखरीत अखेरच्या क्षणी भाऊसाहेब जनकोजींना पुण्यास पाठविण्याचा प्रयत्न करतात. परंतु भाऊसाहेब अडचणीत असताना आपण सुखरूप रहावे हे त्यांना मान्य नाही. ते भाऊसाहेबांच्या बरोबरच युध्दात उडी घेतात. यातून त्यांचा निस्वार्थीपणा दिसून येतो. जनकोजी शिंदे म्हणजे पेशव्यांचा एक हात. पेशव्यांना वेळोवेळी आधार देणारा, असे त्यांचे व्यक्तिमत्व दिसून येते.

### ३.भाऊसाहेब-

पानिपतच्या बखरीत आणि भाऊसाहेबांच्या बखरीत भाऊसाहेबांचे व्यक्तिचित्रण हे एका नायकाला साजेसे केले आहे. या दोन्हीही बखरीत त्यांच्या विविध व्यक्तीमत्वाचे पैलू त्यांची उक्ती-कृती. त्यांचे आचार-विचार असे अनेक रंगछटांनी अतिशय उठावदार केले आहे.

कर्तव्यनिष्ठ-भाऊसाहेबांच्या बखरीत शिंदे-होळकरांनी एकमेकांच्या संघर्षातून पेशव्यांचे नुकसान केले. अवघे हिंदस्थान एकत्र आले, बळावले तेव्हा 'पाण्याआधी वळण बांधिता उत्तम' असा दृढनिश्चय करून आपण उत्तरेकडील मोहिमेवर जावे असे भाऊ ठरवतात. त्यात राजकर्ता या नात्याने त्यांचे कर्तव्य दिसून येते. तसेच पाणिपतच्या बखरीत ही ''शरीर तृणप्राय समजून मर्दुमीचा हिया न सोडिता, समशेरची शर्थ करून दाखवावी. सत्कीर्ती करून मरावे या भूषणापूरते काय आहे? कुरूक्षेत्री रणांगणाचे ठायी पराक्रम करून मृत्यू आल्यास दुसरे काय पाहिजे? संपूर्ण वसुंधरेचे राज्य करीन किंवा इंद्रपदीचा घेईन.'' या वचनातून त्यांची क्षात्रधर्मीय वृत्ती तसेच कर्तव्य वृत्ती दिसून येते.

हट्टी स्वभाव-आपण पानिपतचे युध्द जिंकुन निश्चितपणे परत येवू असा आत्मविश्वास त्यांना वाटतो. अशा वेळी माघार घेणे भ्याडपणाचे लक्षण आहे असे त्यांना वाटते. भाऊसाहेबांनी स्वत: उत्तरेकडे येवू नये असे मल्हाररावांना वाटते पण दत्ताजीसारख्या वीराच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी ते जातात. गाजुदीखानास वजीरी द्यावी असा आग्रह अनेक मराठे सरदार करतात पण भाऊसाहेबांच्या हट्टी स्वभावामुळे ते नारोशंकरास वजीरी देतात. त्यामुळे त्यांचे जवळचे सहकारी दुखावतात. खर्चाची अडचण जाहल्यामुळे जाटासारख्या हितकर्त्याचा ते अपमान करून छताचे रूपे काढतात. जाटांचा विश्वास नाही 'हा कार्यवाहू समयास फिरून पडेल आम्हास हाच शत्रू याचा भरवसा नाही.' असे त्यांना वाटते. हा भाऊसाहेबांचा हट्टी स्वभाव दोन्हीही बखरीत दिसून येतो. तह करण्याचा प्रस्ताव आला असता ते तीनही वेळा हा प्रस्ताव धुडकावतात.

स्वाभिमानी-संयमी-भाऊसाहेब शूर वीर होते. पानिपतच्या युध्दात ते प्राणपणाने लढले. पानिपतावरील अन्नाची टंचाई, रसद नाही पैशाची कुमक नाही. फौज अन्नाने बेजार झाली. अशा परिस्थितीत पुण्याकडून कुमक मागविणे भाऊसाहेबांना पटले नाही. ते दत्ताजी शिंदे व

विश्वासरावांना म्हणाले, ''तुम्हास जीव जगवणे असेल तर उत्तम आहे. तुम्ही इथून निघून जावे. दैव असेल तसे आमचे होईल. भाऊसाहेबांच्या बखरीतील स्वाभिमान तसेच पानिपतच्या बखरीत ज्यावेळी सर्व सरदारांनी, 'तुमचे बुध्दीस भ्रंश जाहाला. कोणाचे तिळमात्र ऐकत नाही. या हट्टाने सर्व लयास गेले. तुम्ही सर्वांचा घात केला.' अशा प्रकारची सर्वांची उत्तरे ऐकूनही स्थिरचित्त राहिलेल्या भाऊसाहेबांनी 'दुषणे लाविता ती प्रमाणच' असे म्हणून संयम राखला.'

निस्वार्थी-पाणिपतच्या बखरीत चिरंजीव विश्वासराव गोळी लागून कामी आले असता आपण मोठा पराक्रम जरी करून पुण्यास गेलो तरी सौभाग्यवती गोपिकाबाई मुखावलोकन करणार नाहीत. तेव्हा पुण्यास शिंदेंना जाण्यास विनंती करतात. तसेच भाऊसाहेबांच्या बखरीत तुकोजी शिंदे म्हणतात-''तुम्ही वाचला तर अवघ्यांचा सूड घ्याल. नाही तर तुमचे मागे गोष्टी आटपल्या.'' त्यावर भाऊसाहेब म्हणतात पुण्यात जावून नानासाहेबांस काय म्हणून तोंड दाखवावे?'' यातून भाऊसाहेबांचा निस्वार्थीपणा दिसून येतो. तसेच त्यांची वीरवृत्ती, मानीपणा दिसून येतो.

अशा पध्दतीने बखरकाराने भाऊसाहेबांच्या विविध गुणांचे वर्णन केले आहे.

## भाषाशैली

पाणिपतच्या बखरीत बखरकाराने शेलक्या विशेषणांनी सजलेली दुडक्या चालीची लयबध्द भाषा ऐतिहासिक वातावरणाचे रूप साकार करते. उदा.''शेलके घोडे, शेलके माणूस, शेलके हत्ती, शेलके जवाहीर, शेलकी तलवार, शेलक्या तोफा---वगैरे सर्वस्व बुडाले.'' येथे लयबध्दता व नादमाधुर्य यांचा प्रत्यय येतो. शेवटी सर्वस्व बुडाले याची खंत मनाला विषण्णता आणते. ''संपूर्ण वसुंधरेचे राज्य करीन किंवा इंद्रपदीचे घेईन.'' असे युध्दात जोशपूर्ण म्हणणारे भाऊसाहेब शेवटी ''आजचा निदान समय शंभर वर्षे पूर्ण भरली आणि आज सतीचे वाण घेतले.'' या वाक्यातून कारूण्य निर्माण झाले आहे. बखरकाराने मेघांचे ढग उठतात व विद्युल्लता चमकून लागलीच नाहीशी होते त्याप्रमाणे भाऊसाहेबांनी संग्रामात उडी घेतली.'' या वर्णनातील वीज व भाऊसाहेब यांच्यातील साधर्म्य काव्यात्मक आणि कलात्मक झाले आहे. शत्रूचा विजय व मराठी सैन्याचा पराभव होत असता बखरकार लिहितो ''ते समयी श्रीहरी त्या अग्निकडी फौजेस सन्मुख जाहला. श्रीमंत पेशवे बहादूर यास विन्मुख जाहला. याजमुळे सर्वांचा नाश जाहाला.'' इथली कल्पक मार्मिकता व अल्पाक्षर रमणीयता लक्षवेधी झाली आहे.

भाऊसाहेबांच्या बखरीत बखरकाराने अगदी सुटसुटीत वाक्यातून लयबध्दता व नादमाधुर्य साधले आहे. 'हल्ला करून किल्ला घेतला.''नजिबखान रोहिला जसा ससा भाणवसात तसा.' तसेच व्यक्तींच्या भाव भावना जागृत करण्यासाठी व आव्हान निर्माण करण्यासाठी बखरकाराने

सुगमता व सुबोधता आणली आहे. उदा. दुधाचे रांजणीत कांज्याचे शितोडे-पायदळ कडब्यासारखे कापले-तुपाचे घागरीवर उंद्राचे पिटुकले बसते तैसा. प्रत्यक्ष शत्रू आपल्यासमोर ठेपल्यानंतर बखरकार लिहितो 'आग्न लहान म्हणो नये तसेच शत्रू अल्प मानू नये.' शत्रूच ज्यावेळी घाबरून मदत मागतो अशावेळी 'शरण येईल त्यास मरण चिंतू नये' म्हणून जयाजी शिंदे मदत करतात. परंतु 'येकीकडून आड आणि येकीकडून विहीर' अशी परिस्थिती निर्माण होते. ह्या वाक्यातून काव्यात्मकता साधून अनुभवसंपन्नता व विचारपूर्ण सुविचारांचा वापर केला आहे. 'पोटचे घ्यावे व पाठचे देवू नये', 'जात्यातले रडती आणि सुपातले हसती' इ. वाक्यांतून वाचकांच्या सुख दु:खात विषण्णता निर्माण केली आहे.

या दोन्ही बखरींचा विचार केला असता पाणिपतच्या बखरीच्या तुलनेने भाऊसाहेबांच्या बखरीत सहज सुटसुटीत वाक्ये आहेत. अनेक ठिकाणी दृष्टांत व अलंकार युक्त वाक्ये दोन्हीही बखरीत आली आहेत; तरी पण भाऊसाहेबांच्या बखरीत अतिशय सुंदर अशी उदाहरणे बखरकाराने दिली आहेत. बळवंतराव होळकरांना म्हणतात, "सुभेदार, तुमचे अंगी दुराणीचे भय. शहारे म्हणजे हीव अंगात शिरले ते अद्यापि जाईना." अशा उपहासपूर्ण वर्णनामुळे भाऊसाहेबांची बखर रसाळ वाटते.

भाषाशैलीच्या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर अधिक समृध्द वाटते. उत्तर हिंदुस्थानातील मराठ्यांच्या अनेक स्वाऱ्या, मोहिमा, लढाया यांचे वर्णन त्यात आल्याने त्या बखरीची पृष्ठभूमी व्यापक झाली आहे. म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, काव्याच्या ओळी आणि अरबी, फार्सी, उर्दू शब्दांचे मोठे प्राबल्य त्या भाषेवर आढळते. म्हणून भाऊसाहेबांची बखर भाषादृष्ट्या अधिक कसदार बखर आहे. पाणिपतची बखर या बखरीतील भाषादेखील सहज आणि सुंदर झाली आहे. बखरकाराने ही भाषा ओघवती केली आहे. शिंदे-होळकर आणि अन्य सरदार भाऊसाहेबांजवळ जाऊन त्यांना दुषणे देतात त्या प्रसंगीचे त्यांचे निवेदन प्रदीर्घ आहे. ते प्रवाहीदेखील आहे. असे प्रदीर्घ निवेदन भाऊसाहेबांच्या बखरीत येत नाही. पाणिपतच्या बखरीतील युध्दवर्णने भाषाशैलीदृष्ट्या सरस झाली आहेत. भाऊसाहेबांच्या बखरीतील मलकाजमानी व नजीबखान यांच्यातील संवाद प्रदीर्घ झाला आहे. त्यात भूतकालीन इतिहासाचे अनेक संदर्भ येतात. शेवटी त्या दोघात एक योजना आखली जाते. हा भागच पाणिपतच्या बखरीत येत नाही.

## संवादलेखन

पाणिपतच्या बखरीत आणि भाऊसाहेबांच्या बखरीत बखरकाराने संवादातून व्यक्ती आणि घटना जिवंत केल्या आहेत. संवादातून येणारी स्वगते, भाषणे, संभाषणे, आव्हाने आणि

आवाहने यातून नाट्यमयतेला उठाव प्राप्त झाला आहे. पाणिपतच्या बखरीत अबदालीने वडीलांकरवी भाऊसाहेबांच्याडे पाठविलेला प्रस्ताव ''तुम्ही जोरावर होऊन अटकेची सरहद्द मारवाड व लाहुरप्रांत व बंगाला, अंतखेर, काशी, प्रयाग, गया व काश्मीरपावेतो मुलुख काबीज करायची उमेद धरून बादशाही खजिना बंद केला. चितोड द्वारका गुजरात आग्रा प्रांतातील खंडणी घेवून अंम्मल करिता या खेरीज दिल्ली म्हणजे बादशाही तख्तची जागा तेथील अमर्यादा करून फौज दरवर्षी पाठवून कैदखाने तुम्ही आपली बसविली. हे सर्व बंद करून नर्मदा दक्षिणतीरापासून पलीकडील हद्द संरक्षण करावे बादशाही सनद करून नोकरी करत जावे.'' त्यावर भाऊसाहेबांनी त्याला दिलेले सडेतोड उत्तर, ''हिंदुपत बादशाहीचे बंदोबस्त आमचे आम्हीच करू हे सांगणेची तुम्हास गरज नाही. तुम्ही लढाईस तयार असाल तर आम्हीही लढण्यास तयार आहोत.'' अशा बाणेदार उत्तरातून तो प्रसंग जिवंत करतो. भाऊसाहेब शिपायांना युध्दात उतरवतात तेव्हा, ''आम्ही जिवित्वाची तमा धरत नाही महाराजांचे पुण्य आमचे मस्तकी असता इराणीची बिशाद काय? मारून गर्दीस मिळवून देवू.'' ह्या संवादातून नाट्यमयता साधलेली दिसते. ''रावसाहेब! तुम्हास मी मरणाचे घरी आणले ही गोष्ट सर्वोपरी आमचे पासून गेली.'' ह्या संवादातून भावसत्य दिसून येते. या बखरीतील संवाद प्रसंगानुरूप, जोशपूर्ण, आक्रमक आहेत तर काही ठिकाणी भाववाही झाले आहेत.

भाऊसाहेबांच्या बखरीतही, ''राव, तुम्ही आम्हावर का रूसला? आमचे हातचा विडा घेतला नाही. ईश्वरे आम्हास एवढे निर्वाण का दाखविले?'' या बळवंतरावांच्या पत्नीच्या संवादातून करूणभाव साधलेला दिसतो. तसेच ''तुम्ही लौकिक करून गेला तरी मीही वाचणार नाही. तुमची सांगातीण होईन.'' या संवादातून भावना जागृत केलेली दिसून येते. जयाजी शिंदे जेव्हा युध्दात घायाळ होतात तेव्हा दत्ताजी शिंदे जवळ येवून शोक करू लागतात तेव्हा, ''वैरी युध्दास आला आणि तू रांडेसारखा रडतोस? हे क्षत्रिय धर्मास उचित की काय? आता मजला काही होत नाही. तुम्ही शत्रू पराभव करावा.'' या जयाजी शिंदेच्या संवादातून नाट्यमय प्रसंगाची प्रचिती येते. ''पटेल हमारे साथ तुम और लढेंगे?'' हे कुतुबशहाचे प्रश्न आणि ''बचेंगे तो और भी लढेंगे।'' ह्या दत्ताजी शिंदेंच्या उद्‌गारातून नाट्यमय प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. ''भाऊसाहेब ! तुम्ही वाचला तरी अब्दाल्यांचा सूड घ्याल नाही तरी तुमचे मागे अवघ्याच गोष्टी आटपल्या.'' या संवादातून भाऊंची थोरवी वर्णिली आहे.

या दोन्ही बखरींचा विचार केल्यास या दोनही बखरीतून उत्कृष्ट संवादाच्या माध्यमातून प्रसंगनिर्मिती साधलेली दिसून येते. त्यामुळे त्यात येणारी स्वगते संभाषणे, आव्हाने जिवंत झालेली दिसून येतात. विविध भाषा बोलणाऱ्या व्यक्ती संवादातून समर्थपणे उभ्या केल्या आहेत तरीही भाऊसाहेबांच्या बखरीतील संवाद लेखन उत्कृष्ट झालेले आहे. बखरकाराने

संवादाच्या माध्यमातून स्वभावचित्रण व प्रसंगनिर्मिती समर्थपणे साधलेली आहे.

## रसपरिपोष

पाणिपतच्या बखरीत आणि भाऊसाहेबांच्या बखरीत बखरकाराने विविध रसांचा वापर करून व्यक्ती, घटना प्रसंग हलत्या बोलत्या केल्या आहेत. युध्दात वीर वृत्तीने भारलेल्या व्यक्ती त्यांचे पराक्रम, आव्हाने, युध्दातून घेतलेली माघार, भयभीत अवस्था यासाठी बखरकाराने काही दृष्टांत, दाखले, काही अद्‌भुत घटना यांचा आधार घेतलेला दिसून येतो.

वीररस-भाऊसाहेबांच्या बखरीत बचेंगे तो और भी लढेंगे। असे म्हणणारे दत्ताजी शिंदे प्राणाची बाजी लावून लढणारे शूर सैनिक हाणामारा म्हणून शत्रूवर तुटुन पडणारे भाऊसाहेब तसेच पाणिपतच्या बखरीत 'हर हर महादेव' अशी गर्जना करून युध्दात लोटटुन देणारे शिपाई तसेच 'हिंदुचे मुसलमान होऊ परंतु छत्रपतींचे नाव राखू' म्हणून लढणारे सैनिक. पूर्वी रामायण व महाभारतामध्ये युध्द झाले त्याप्रमाणे पानिपतचे युध्द झाले. त्या शूर वीरांच्या झपाटलेल्या पराक्रमाचे वर्णन या दोनही बखरीत आढळून येते. ''मुर्द्यावर मुर्दे पडू लागले. वीर रणामध्ये माजले. रणमद चढला. केवळ दशाग्नी शताग्नीशी मारू लागले.'' ही वर्णने तसेच ''तुम्ही जेथे उडी टाकून गाडून उभे राहाल तेथे आम्ही कत्तल होऊ. परंतु रण सोडणार नाही. आम्ही मराठे झाडास बांधले तर झाड घेवून जावे हा आमचा स्वभाव'' इ. वीर रसाला पोषक उदाहरणे या बखरीतून आढळून येतात. या दोनही बखरीत वीर रसांची वर्णने आली असली तरी पाणिपतच्या बखरीत वीर रसाची वर्णने अधिक प्रकर्षाने जाणवतात.

करूण रस - पानिपतच्या युध्दात मराठी सैन्यांला अपयश आल्याने बखरकाराने त्यांच्या व्यक्तीजीवनातील कारूण्याचे दर्शन अधिक गडद केले आहे. पाणिपतच्या बखरीत लहानथोर सैनिकांना भाऊसाहेब म्हणतात ''उद्या सर्वांनी खंदकपार होऊन मारता मारता कटून मरावे.'' या वाक्यातून शोकात्म अभिव्यक्ती निर्माण झालेली दिसते. विश्वासरावांना भाऊसाहेब म्हणतात,''विश्वासराव साहेब तुमचे वय लहान. तुम्ही सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाही--- हे महत्तर अपेश श्रीसांबाने माझे विभागास आणले.'' तसेच भाऊसाहेबांच्या बखरीत बळवंतराव मेहेंदळे म्हणतात-''ईश्वरे यश दिले तरि उत्तम नाहीतर पुन्हा तुमची आमची भेट स्वर्गी होईल.'' बळवंतरावांची पत्नी-''ईश्वराने एवढे निर्वाण का दाखविले?'' आपली आई सती जाणार हे समजताच तिच्या मुलाने केलेला शोक ''आम्ही आन पाणी कोणास मागावे? कोणावर रूसावे?'' त्यावर तिने -''तुम्ही आनपाणी ईश्वराजवळ मागावे आणि ईश्वरावर रूसावे.'' असे दिलेले उत्तर यातून करूण रस अधिक उत्कट झाला आहे. पानिपतच्या युध्दातून निशाण गुंडाळून पळ काढणाऱ्या सैनिकांचे वर्णन मन हेलावून टाकते. मुडद्यांनी खंदक भरले. दिल्लीतील

बायकासुध्दा सैनिकांना मारून लुटु लागतात. यासारखे दुर्दैव कोणते? मुडदे मिळविण्यासाठी लाच द्यावी लागली. या युध्दात मराठी स्त्रिया ही सुटल्या नाहीत. त्यांना फाटकी वस्त्रे गुंडाळून पळ काढावा लागला. भाऊसाहेबांच्या पत्नीला पार्वतीबाईंना बुणग्याबरोबर पळून जावे लागले. 'मी भाऊसाहेबांची स्त्री आहे. मजला घोड्यावर घ्यावे' अशी विनवणी करावी लागली. गिलचे शाळवाची कणसं कापल्यासारखी डोचकी कापीत. घायाळ जनकोजीना घोड्यावर बसवून दोन्ही बाजूस धरून फौज तडक पळू लागली. घायाळ जनकोजी 'पाणी पाणी' म्हणताही पाणी द्यावयास दम निघेना.

या दोन्ही बखरींमध्ये करूण रस निर्माण झाला आहे. तरीही भाऊसाहेबांच्या बखरीत कारूण्याला पाझर फोडणारी अनेक उदाहरणे आहेत. अनेक प्रसंगातून अत्यंत समर्पक शब्दात बखरकाराने करूण रस साधला आहे. त्यामुळे भाऊसाहेबांच्या बखरीतील कारूण्य हे रसिकांच्या मनात घर करून राहते.

बिभत्स रस-पाणिपतच्या आणि भाऊसाहेबांच्या बखरीत काही मोजक्याच अवतरणांच्या द्वारा बिभत्स रस साधलेला दिसून येतो. ''मुर्द्यावर मुर्दे पडू लागले. शिरे तुटोन धडावेगळी जाहाली. कोणाचे उदरे तुटोन अंतरमाळा लोंबू लागल्या. रक्ताच्या नद्या वाहिल्या. रक्ताचा चिखल झाला. डोचकी कापली हातपाय तुटले.'' इत्यादी बिभत्स वर्णने दिसून येतात. पाणिपतच्या बखरीत बखरकाराने अखेरच्या निकराच्या युध्दातील वर्णने, 'एक धारातीर्थी पडले. एक शूरत्व करून विराले--तेव्हा विशाल समुदाय आनंदे करोन नाचो लागला की चारशे वर्षे झाली. क्षुधातुर होतो. ते समयी अठरा अक्षौहिणी दळाचे रक्तमांस भक्षिले.' इ. वर्णनातून बिभत्स रसाची छटा जाणवते.

थोडक्यात 'भाऊसाहेबांची बखर' सरळ व रसाळ कथावस्तू, प्रभावी व्यक्तिदर्शन, ठसठशीत संवादलेखन आणि वाचकावर वर्चस्व निर्माण करणारा रसपरिपोष या विविध वाङ्मयगुणांनी अधिक संपन्न असल्याचे ध्यानात येते. 'पाणिपतची बखर' मध्ये प्रदीर्घ भाषणे आवेशपूर्णरीत्या आली आहेत. प्रदीर्घ संवाद हे त्या बखरीचे खास वैशिष्ट्य आहे. 'अबदालीचा इशारा', 'भाऊसाहेबांचे सडेतोड उत्तर' आणि होळकर -शिंदे व अन्य सरदारांनी भाऊंना दिलेले दुषण, 'भाऊंनी केलेली उठावणी' व समजावणी-ह्या सर्व संवादांतील जोरदार आवेश आणि आक्रमकता खूपच प्रभावी झाली आहे. त्यातील युध्दवर्णनेही वीररस संपन्न झाली आहेत. भाऊसाहेबांचे तेजस्वी व्यक्तिचित्रण हाही एक त्या बखरीचा विशेष झाला आहे. भाऊसाहेबांची बखर विस्तृत व बांधेसुद कथानक, वेधक व्यक्तिचित्रण आणि समृध्द रसपरिपोष यांच्या माध्यमातून सरस ठरते हे नि:संशय !